**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आय आय टी मुंबईत कर्करुग्णांसाठी CAR-T सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण
- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली, प्रकाश आंबेडकर, नवनीत राणा, प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह विविध उमेदवारांचे अर्ज दाखल
- अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र वैध असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा
- नांदेड आणि अंबरनाथमध्ये झालेल्या दुर्घटनांमध्ये ६ मजुरांचा मृत्यू

  **आणि**
- मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजारात आज मोठ्या चढ-उतारानंतर निर्देशांक विक्रमी पातळीवर बंद

**<><><><><>**

कर्करुग्णांसाठी CAR-T सेल उपचार पद्धतीमुळे सर्व मानव जातीसाठी आशेचा नवा किरण निर्माण झाल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. त्यांनी मुंबई दौऱ्यात आय आय टी इथं CAR-T सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण केलं. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. संपूर्णपणे भारतात विकसित झालेल्या या उपचार पद्धतीमुळे अनेकांचे प्राण वाचतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या उपचार पद्धतीमुळे भारताला प्रगत वैद्यकीय सेवा देणाऱ्या देशांच्या यादीत स्थान मिळाल्याची भावना राष्ट्रपतींनी व्यक्त केली.

रुग्णांसाठी किफायतशीर आणि सहज उपलब्ध असलेल्या टाटा मेमोरियल सेंटर आणि आयआयटी मुंबईनं संयुक्तरित्या याची निर्मिती केली आहे. या पद्धतीमुळे कमीत कमी खर्चात रुग्णांवर परिणामकारक उपचार शक्य होणार आहेत.

यावेळी राज्यपाल रमेश बैस, आयआयटी मुंबईचे संचालक शुभाशीष चौधरी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

**हिंगोलीत** शिवसेनेचे नांदेड जिल्हा प्रमुख बाबुराव कदम कन्हाळीकर यांनी आज अर्ज भरला. त्यापूर्वी झालेल्या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. यापूर्वी पक्षानं इथून विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली होती. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून नागेश पाटील-अष्टीकर रिंगणात आहेत.

**यवतमाळ-वाशिम** लोकसभा मतदारसंघामधून शिवसेनेच्या राजश्री पाटील यांनी आज अर्ज भरला. त्यानंतर झालेल्या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह दादा भुसे, संजय राठोड उपस्थित होते.

**अमरावतीमध्ये** भाजपा उमेदवार नवनीत राणा यांनी अर्ज भरण्यापूर्वी सभा झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते. काँग्रेसकडून बळवंत वानखेडे आणि बच्चू कडू यांच्या पक्षाकडून दिनेश बूब रिंगणात आहेत.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज अकोल्यातून

अर्ज भरला. यावेळी विविध समाजाचे नेते उपस्थित होते. विद्यमान खासदार संजय धोत्रे यांचे पुत्र अनुप धोत्रे भाजपाचे आणि अभय पाटील हे **अकोल्यातून** काँग्रेसचे उमेदवार आहेत.

**नांदेडमध्ये** भाजपा उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर आणि वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अविनाश भोसीकर यांनीही आज अर्ज भरला. काँग्रेसनं या मतदारसंघातून वसंतराव चव्हाण यांना उमेदवारी दिली आहे. नांदेडमध्ये शेवटच्या दिवशी ७२ अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत नांदेड लोकसभा मतदारसंघातून एकूण ९२ अर्ज दाखल झाले आहेत.

**बुलडाण्यातून** आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांनी अर्ज भरला. शिवसेनेनं प्रतापराव जाधव यांना पुन्हा या मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात एकूण २९ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत.

**परभणीतून** वंचित बहुजन आघाडीनं ऐनवेळी उमेदवार बदलला. यापूर्वी पक्षानं बाळासाहेप उगले यांना उमेदवारी दिली होती. पण अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी पंजाब डख यांना पक्षानं AB फॉर्म दिला आणि त्यांनी अर्ज भरला. गेल्या निवडणुकीतले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार आलमगीर खान तिसऱ्या स्थानी होते. पाच वर्ष वंचितचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलं. तरीही पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्यानं त्यांनी बहुजन समाज पार्टीकडून अर्ज भरला. माजी खासदार गणेशराव दुधगावकर यांच्या मुलाने भाजपचा सदस्याचा राजीनामा देऊन शक्ती प्रदर्शन करून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघातून महायुतीच्या पाठिंब्यावर राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर आणि उद्धव ठाकरेंच्या पक्षाकडून संजय जाधव निवडणूक रिंगणात आहेत.

<><><><><>

**उस्मानाबाद** लोकसभा मतदारसंघासाठी अर्चना पाटील यांची उमेदवारी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत जाहीर केली. तत्पूर्वी अर्चना पाटील यांनी आज पक्षात प्रवेश केला. अर्चना पाटील या भाजपा आमदार राणा जगजीत सिंह पाटील यांच्या पत्नी आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज २ उमेदवार जाहीर केले. भिवंडीतून सुरेश म्हात्रे आणि बीडमधून बजरंग सोनवणे यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

<><><><><>

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं अनुसूचित जातीचं जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवलं आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनं पुरेशा कागदपत्रांची तपासणी करुन त्यांचं जात प्रमाणपत्र वैध ठरवलं आहे. त्यामुळं त्यात कोणाच्याही हस्तक्षेपाची गरज नसल्याचं स्पष्ट मत न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि संजय करोल यांच्या पीठानं नोंदवलं.

माजी खासदार आनंदराव अडसूळ आणि सुनिल भालेराव या नेत्यांनी राणा यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेणाऱ्या याचिका २०१७ मध्ये दाखल केल्या होत्या. त्यावर राणा या शीख-चमार जातीतल्या आहेत. महाराष्ट्रातली मोची किंवा चांभार ही जात यापेक्षा वेगळी असल्याचं निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयानं त्यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवलं होतं. त्याला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. शीख-चमार यातला शीख हा शब्द धर्मवाचक असल्याचा दावा राणा यांनी केला होता.

<><><><>

उत्तर - पश्चिम मुंबई मतदार संघातून निवडणूक लढवणार असल्याचं संजय निरुपम यांनी आज जाहीर केलं. काँग्रेसनं काल त्यांची पक्षातून हकालपट्टी केली. पक्षविरोधी वक्तव्यं आणि शिस्तभंगांच्या तक्रारीनंतर ही कारवाई झाली.

<><><><>

नांदेडमध्ये मलवाहिनी चेंबर दुरुस्तीचं काम करत असताना २ मजुरांचा चेंबरमध्ये गुदमरून मृत्यू झाला. या मजुरांना वाचवण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीचाही मृत्यू झाला. हे २ मजूर मलवाहीनी चेंबर बंद करण्यासाठी चेंबरमध्ये उतरले होते. काम करत असतांना चेंबरमधल्या गॅसमुळे श्वास कोंडुन दोघंही बेशुध्द पडले. त्यांना वाचवण्यासाठी एक नागरिक चेंबरमध्ये उतरला असता तोही बेशुध्द पडला. या तिघांना महापालिकेच्या अग्निशमन विभागानं तात्काळ बाहेर काढून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केलं. मात्र त्या तिघांचाही मृत्यू झाला.

<><><><>

ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ इथं जांभुळ गावात आज पाण्याची टाकी स्वच्छ करताना विजेचा धक्का लागून तीन मजुरांचा जागीच मृत्यू झाला. पंपिंग यंत्रातून वीज पाण्यात शिरल्यामुळे ही दुर्घटना झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. या घटनेचा तपास सुरू आहे.

<><><><>

देशातले शेअर बाजार आज मोठ्या चढ-उतारानंतर विक्रमी पातळीवर बंद झाले. सेन्सेक्सच्या आजच्या किमान आणि कमाल पातळीतला फरक १ हजार अंकांहून अधिक होता.  कालच्या तुलनेत शेअर बाजार आज तेजीत सुरू झाले. पण नंतर त्यात घसरण होत गेली. सेन्सेक्सनं यावेळी ७३ हजार ४८५ अंकांच्या आणि निफ्टीनं २२ हजार ३०४ अंकांच्या नीचांकी पातळीला स्पर्श केला. त्यानंतर

बाजारानं पुन्हा तेजीकडे वाटचाल केली आणि सेन्सेक्सनं ७४ हजार ५०२ अंकांच्या आणि निफ्टीनं २२ हजार ६१९ अंकांच्या विक्रमी पातळीला स्पर्श केला. दिवसअखेर सेन्सेक्स ३५१ अंकांची वाढ नोंदवून ७४ हजार २२८ आणि निफ्टी ८० अंकांची वाढ नोंदवून २२ हजार ५१५ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत आज नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. डॉ. मोहन भागवत यांची पुन्हा सरसंघचालक म्हणून निवड झाली आहे. दत्तात्रय होसबाळे यांची सरकार्यवाह म्हणून फेरनिवड झाली आहे. डॉ. कृष्णकुमार, के सी मुकुंद, अरुण कुमार, रामदत्त चक्रधर, अलोक कुमार, अतूल लिमये यांची सह सरकार्यवाह पदावर निवड झाली आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सची पंजाब किंग्जशी लढत होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात काल सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, कोकणात तुरळक ठिकाणी दिवसाच्या तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे.

राज्यात आज वर्धा इथं सर्वाधिक ४२ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. विदर्भात रात्री उकाडा जाणवण्याची शक्यता असून या कालावधीत उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**